जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१०        दिनांक - ०५/१२/२०२४**

युनिट २ गुन्हे शाखा, पुणे शहर

## कोरेगाव पार्क भागातून ब्रॅन्डेड कंपनीचे बनावट कपडे व इतर वस्तू विक्री करणा-या दुकानांवर छापा एकुण ३५,३१,०५१/- रु.कि.चा.मुददेमाल जप्त

पुणे शहरात वेगवेळया ठिकाणी ब्रॅन्डेड कंपनीचा बनावट मालाची विक्री होत असलेबाबत माहिती मिळाली होती. त्या अनुषंगान कारवाई करणेकामी मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी श्री. प्रताप मानकर, यांचे पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच कंपनीचे अधिकृत प्रतीनिधी मार्फत पुणे शहरात शोध मोहिम चालू असताना प्राप्त माहितीनुसार,कोरेगाव पार्क भागातील नार्थ रोडवरील इनक्लॉथ स्टोअर्स व कोरेगाव पार्क मधील मेन रोडवरील डिनोव्हो क्लॉथ स्टोअर्स मध्ये **LACOSTE, UNDERARMOUR, POLO,GANT** या ब्रॅडेड कंपनीचे रजिस्ट्रेशन असलेले वरील कंपनीचे बनावट लेबल व लोगोचा वापर करुन हुबेहुब दिसणारे बनावट कपडे व इतर वस्तू विक्री चालू होती.

त्याप्रमाणे सदर माहितीची खात्री करुन दिनांक ०४/१२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट २ कडील पथकाने कोरेगाव पार्क भागातील १) नार्थ रोडवरील इनक्लॉथ स्टोअर्स व २) डिनोव्हो क्लॉथ स्टोअर्स मध्ये छापा कारवाई केली असता सदर दोन्ही शॉपमधुन वरील प्रमाणे एकुण ३५,३१,०५१ रु. LACOSTE, UNDERARMOUR, POLO,GANT NIKE या ब्रॅडेड लोगो वापरुन दुकानाचे मालक १) मोनिश लिलाराम अकतराय वय २३ वर्ष रा.२०२० अशोका बिल्डिंग ग्रीन व्हॅली वानवडी पुणे २) सोनू राम लोकनादन वय २६ रा.लेन नंबर ४ अजिंक्य तारा सोसायटी कवडेनगर नवी सांगवी व ३) एक महिला यांच्यावर कारवाई केली असून,त्याबाबत **कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.क्रमांक १७९/२०२४ कॉपीराईट ॲक्ट १९५७ चे कलम ६३,६५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त श्री शैलेश बलकवडे ,पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री निखिल पिंगळे,मा. सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री गणेश इंगळे यांचे मागदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी पोलीस निरीक्षक प्रताप मानकर,सहायक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ,पोलीस उप निरीक्षक नितिन कांबळे, पोलीस अंमलदार शंकर नेवसे, अमोल सरडे, ओमकार कुंभार, संजय आबनावे ,गणेश थोरात, हनुमंत कांबळे, साधना ताम्हाणे, पुष्पेद्र चव्हाण, विजय पवार, प्रमोद कोकणे, निखिल जाधव, नागनाथ राख या पथकाने केली आहे.